# ललित कला केंद्र (गुरुकुल)
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## ललित कला केंद्र, गुरुकुल विभागात पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांकरीता अत्यंत महत्त्वाच्या सूचना

## शैक्षणिक वर्ष : २०२४-२५

**अभ्यासक्रम :**

१. बी.ए. + एम्.ए. (संगीत) - ५ वर्ष एकात्मिक (बारावी नंतर)
२. बी.ए. + एम्.ए. (नृत्य) - ५ वर्ष एकात्मिक (बारावी नंतर)
३. बी.ए. + एम्.ए. (नाटक) - ५ वर्ष एकात्मिक (बारावी नंतर)

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील ललित कला केंद्र, गुरुकुल विभागात वरील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली असून विद्यापीठाच्या मुख्य संकेतस्थळावरुन विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी करता येणार आहे. (https://campus.unipune.ac.in)

२. बी.ए. + एम्.ए. (संगीत, नृत्य, नाटक) एकात्मिक अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी पाच वर्षाचा असून बारावीनंतर ४ वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर **बी.ए. (संगीत, नृत्य, नाटक)** ही पदवी मिळेल. तर पाचव्या वर्षाच्या शेवटी **एम्.ए. (संगीत, नृत्य, नाटक)** ही पदवी मिळेल.

३. ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख **१० मे २०२४** आहे. त्यानंतर कुठल्याही परिस्थीतीत अर्ज करता येणार नाही याची नोंद घ्यावी. बी.ए. + एम्.ए. (एकात्मिक) **संगीत**, बी.ए. + एम्.ए. (एकात्मिक) **नृत्य** तसेच बी.ए.+ एम्.ए. (एकात्मिक) **नाट्य** विषयाची ऑनलाईन प्रवेश परीक्षा दि. **१३ जून २०२४** रोजी होईल. सविस्तर वेळापत्रक नंतर जाहीर केले जाईल.

४. **सर्व अभ्यासक्रम पूर्ण वेळाचे, व्यावसायिक, गुरुकुल पद्धतीचे आहेत. अभ्यासक्रमासाठी संपूर्ण दिवसभर विद्यापीठात उपस्थिती असणे आवश्यक आहे.** प्रवेश चाचणी (OEE : Online Entrance Examination) तसेच अभियोग्यता कलचाचणी (AAT : Audition Aptitude Test) घेऊनच विद्यार्थ्यांस प्रवेश दिला जातो. त्यासाठी संगीत, नृत्य, नाटय ह्या विषयांमध्ये किमान गुणवत्ता, पूर्वप्रशिक्षण आणि योग्य पूर्वानुभव असणे आवश्यक आहे.

५. सदर अभ्यासक्रम स्वयंनिर्वाही तत्त्वांवरचे असलेमुळे शासनाद्वारे मिळणा-या कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्तींची जबाबदारी विभागाकडे नाही. एकात्मिक अभ्यासक्रम नव्याने सुरू झालेले असलेमुळे सदर अभ्यासक्रमांना कोणतीही शासकीय शिष्यवृत्ती लागू होणार नाही.

६. ललित कला केंद्र, गुरुकुल विभागातील अभ्यासक्रमांसाठी पूर्वप्रशिक्षण आणि पुर्वानुभव आवश्यक असलेमुळे प्रवेश घेताना त्यासंबंधातील योग्य ती कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. तशी नसल्यास प्रवेश मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

७. विद्यापीठ प्रवेश प्रक्रियेनुसार विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रत्येक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली अर्हता दिलेली आहे. त्यासाठी योग्य ती कागदपत्रे सुरुवातीलाच सादर करावी लागतील. तथापी OEE व AAT झाल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या वेळी केवळ निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या कायदपत्रांची पडताळणी केली जाईल विद्यापीठ नियमांनुसार योग्य ती कागदपत्रे नसल्यास संबंधीत विद्यार्थ्याला प्रवेश मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

८. प्रवेश प्रक्रियेसाठी संकेतस्थळाचा पत्ता : **https://campus.unipune.ac.in**

**विभागप्रमुख**
ललित कला केंद्र, गुरुकुल
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# बी.ए. + एम्.ए. (एकात्मिक अभ्यासक्रम बारावीनंतर ५ वर्षाचा)
# संगीत, नृत्य, नाटय : प्रात्यक्षिक परीक्षेचे स्वरूप

## *संगीत*

### शैक्षणिक अर्हता : बारावी उत्तीर्ण + संगीत विशारद प्रथम अथवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण

(१) **गायन** : एकूण ५ रागांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी एका रागातील तुम्हाला चांगला गाता येणारा बडा व छोटा ख्याल १० ते १५ मिनिटे सादर करण्याची क्षमता असावी व एक सुगम संगीतप्रकार सादर करण्याची क्षमता अपेक्षित आहे.

(२) **वादन (अवनध्द वाद्य)** : एकूण ३ तालांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी एका तालामध्ये प्रत्येकी १० ते १५ मिनिटे एकलवादन करण्याची क्षमता अपेक्षित.

(३) **वादन (तंत व सुषिर वाद्य)** : किमान ५ रागांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी एका रागामध्ये मसीतखानी व रजाखानी गत व सुगम संगीतप्रकार किंवा कोणत्याही रागातील धुन वाजवून दाखविणे.

**सूचना : आपण निवडलेल्या राग व ताल यांची यादी सोबत असलेल्या google form मध्ये भरून पाठविणे.**

**(Link:www.unipune.ac.in/dept/fine_arts/centre_for_performing_arts/cpa_webfiles/admission.htm)**

## *नृत्य*

### शैक्षणिक अर्हता : बारावी उत्तीर्ण + प्रवेशिका पूर्ण अथवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण

१) **कथक :**

१) तिनताल-ठाठ, आमद, तोडे-तुकडे, परन तिहाई-गिनती कवित्त, चक्रदार परन, चक्रदार तिहाई, पढन्त इ.

२) झपताल - ठाठ, आमद, तोडे, परन, तिहाई, पढन्त इ.

३) तिनतालात बराबर, दुगुन, चौगुन, अठगुन तिहाई सहित पायावर व हातावर लावता येणे झपतालात बराबर, दुगुन तिहाई सहित हातावर व पायावर लावता येणे.

४) गतनिकास

५) गतभाव
या गोष्टी करून दाखवणे.

२) **भरतनाट्यम् :**

सर्व अडवू चे प्रकार, अलारिपु (तिश्र/चतुश्र), पुष्पांजली/कौत्वम् करून दाखवणे.

## ***<u>नाट्य</u>***

### शैक्षणिक अर्हता : बारावी उत्तीर्ण + किमान ४ नाटकांमध्ये अभिनय, किंवा इतर जबाबदारीचा अनुभव अनिवार्य

१) तुमच्या कोणत्याही आवडत्या नाटकातील एक उतारा साभिनय सादर करून दाखविणे. (ज्या नाटकात तुम्ही काम केलेले नाही असे नाटक निवडावे.)

२) ज्या नाटकात तुम्ही पूर्वी काम केलेले आहे त्या नाटकातील उतारा पाठ म्हणून दाखविणे.

३) आपल्या आवडीची कोणतीही मराठी कविता पाठ म्हणून दाखविणे.

४) आपल्या आवडीचे कोणतेही एक मराठी गाणे गुणगुणून दाखविणे.

५) आपण प्रत्यक्ष पाहिलेल्या कोणत्याही एका नाटकाचे नेपथ्यचित्र कागदावर काढून ठेवावे व ते दाखविणे.

(https://campus.unipune.ac.in)

**विभागप्रमुख**
ललित कला केंद्र, गुरुकुल
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ